मेसीच्या मार्गात इंग्लंडचा अडथळा

प्रथमच 'थ्री-लायन्स'शी सामना; अर्जेंटिनाचे सलग दुसऱ्या अंतिम फेरीचे ध्येय

वृत्तसंस्था, अटलांटा

एकीकडे विश्वविजेतेपद टिकवण्याचे अर्जेंटिनाचे स्वप्न, तर दुसरीकडे तब्बल सहा दशकांनंतर पुन्हा विश्वचषक जिंकण्याची इंग्लंडची महत्त्वाकांक्षा... या पार्श्वभूमीवर यंदाच्या विश्वचषक फुटबॉल स्पर्धेतील दुसरी उपांत्य लढत रोमांचक ठरण्याची चिन्हे आहेत. विशेष म्हणजे, वलयांकित आक्रमक लिओनेल मेसी आपल्या प्रथितयश कारकीर्दीत प्रथमच 'थ्री-लायन्स' अर्थात इंग्लंडचा सामना करेल. त्याला रोखण्याचेच इंग्लंडपुढे सर्वांत मोठे आव्हान असेल. इंग्लंडच्या हॅरी केन आणि ज्युड बेलिंगहॅम या तारांकितांच्या कामगिरीवरही चाहत्यांची नजर असेल.

या दोन संघांमधील प्रत्येक सामना हा केवळ फुटबॉलपुरता मर्यादित राहत नाही. १९८६च्या विश्वचषकातील दिएगो मॅराडोना यांचा वादग्रस्त 'हँड ऑफ गॉड' गोल, त्याच सामन्यातील अप्रतिम वैयक्तिक गोल, १९९८ मध्ये डेव्हिड बेकहॅमला मिळालेले लाल कार्ड आणि दोन्ही देशांतील फॉकलँड बेटांवरील ऐतिहासिक वाद यामुळे इंग्लंड-अर्जेंटिना लढत नेहमीच विशेष ठरली आहे. तब्बल २४ वर्षांनंतर दोन्ही संघ पुन्हा एकदा स्पर्धात्मक सामन्यात आमनेसामने येत असल्याने या लढतीची उत्सुकता आणखी वाढली आहे.

संघर्षमय प्रवास

यंदाच्या विश्वचषकात इंग्लंडचा उपांत्य फेरीपर्यंतचा प्रवास संघर्षमय आणि नाट्यमय ठरला आहे. स्पर्धेच्या सुरुवातीला क्रोएशियावर दणदणीत विजय मिळवणाऱ्या इंग्लंडला त्यानंतर प्रत्येक टप्प्यावर झुंज द्यावी लागली. डीआर काँगोविरुद्ध हॅरी केनच्या दोन गोलच्या जोरावर विजय मिळवल्यानंतर मेक्सिकोविरुद्ध दहा खेळाडूंवर खेळत त्यांनी ३-२ अशी संस्मरणीय बाजी मारली. त्यानंतर नॉर्वेविरुद्ध अतिरिक्त वेळेत ज्युड बेलिंगहॅमने केलेल्या विजयी गोलामुळे इंग्लंडने उपांत्य फेरी गाठली.

बाद फेरीत कस

अर्जेंटिनासाठीही हा प्रवास तितकाच आव्हानात्मक ठरला आहे. साखळी फेरी सहज पार केल्यानंतर बाद फेरीत अर्जेंटिनाचा कस लागला. केप व्हर्डे, इजिप्त आणि स्वित्झर्लंड या तिन्ही तुलनेने दुबळ्या संघांनी अर्जेंटिनाला सहजासहजी विजय मिळवू दिला नाही. तिन्ही सामने अतिरिक्त वेळेपर्यंत गेल्यानंतरच अर्जेंटिनाने उपांत्य फेरी गाठली. त्यामुळे अनुभवी खेळाडूंनी भरलेल्या अर्जेंटिना संघावर सलग लांबलेल्या सामन्यांचा शारीरिक परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. मेसीची सलग नऊ विश्वचषक सामन्यांतील गोलची मालिका स्वित्झर्लंडविरुद्ध खंडित झाली असली, तरी त्याचा प्रभाव कायम आहे. त्यामुळे मेसीचीच कामगिरी पुन्हा निर्णायक ठरण्याची शक्यता आहे.



मेसीला साथ गरजेची

'गोल्डन बूट'च्या शर्यतीत आठ गोलसह आघाडीवर असलेला ३९ वर्षीय लिओनेल मेसी हाच अर्जेंटिनाचा सर्वांत मोठा आधार आहे. उपांत्यपूर्व फेरीपर्यंत त्याने प्रत्येक सामन्यात गोल केला. विश्वचषकातील एकूण २१ गोलसह त्याने स्वतःचाच विक्रम आणखी भक्कम केला आहे. मात्र, त्याला अन्य सहकाऱ्यांची साथ गरजेची आहे. यंदाच्या स्पर्धेत त्याच्या व्यतिरिक्त अर्जेंटिनाच्या कोणत्याही खेळाडूला दोनहून अधिक गोल करता आलेले नाहीत. गेल्या सामन्यात मेसीने गोल न करताही अर्जेंटिनाने विजय मिळवला, ही त्यांच्यासाठी सकारात्मक बाब. मात्र, बाद फेरीतील तीन सामन्यांत अर्जेंटिनाने तीन सामन्यांत पाच गोल स्वीकारल्याने त्यांच्या बचावफळीबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहेत.

केन, बेलिंगहॅमवरच भिस्त

इंग्लंडच्या आक्रमणाची धुरा हॅरी केन आणि ज्युड बेलिंगहॅम या जोडीने प्रभावीपणे सांभाळली आहे. दोघांनी प्रत्येकी सहा गोल करत संघाच्या १३ पैकी १२ गोलमध्ये मोलाचा वाटा उचलला आहे. त्यामुळे अर्जेंटिनाविरुद्ध त्याच्यावरच इंग्लंडची भिस्त असेल. उपउपांत्यपूर्व फेरीत मेक्सिको आणि उपांत्यपूर्व फेरीत नॉर्वे संघाविरुद्ध दोन गोल करत बेलिंगहॅमने इंग्लंडच्या प्रवासात निर्णायक भूमिका बजावली.

१४ दोन्ही संघांमध्ये सर्व स्पर्धांमध्ये मिळून १४ सामने झाले आहेत. इंग्लंडने ६ आणि अर्जेंटिनाने ३ सामने जिंकले असून ५ सामने अनिर्णित राहिले आहेत.

■ वेळः मध्यरात्री १२.३० वा. (गुरुवार) ■ थेट प्रक्षेपण : 'युनाइट ८ स्पोर्ट्स', 'झी ५'

नाट्यमय इतिहास...

■ **१९६२ (साखळी फेरी)**
अर्जेंटिना आणि इंग्लंड यांच्यातील पहिला विश्वचषक सामना. इंग्लंडचा ३-१ विजय.

■ **१९६६ (उपांत्यपूर्व फेरी)**
इंग्लंडचा अर्जेंटिनावर १-० विजय. या सामन्यात अर्जेंटिनाचा कर्णधार अंटोनियो रॅटिनला रेड कार्ड मिळाले. मात्र, त्याने बाहेर पडण्यास नकार दिल्याने आणि अन्य कृतीमुळे वातावरण तंग झाले होते.

■ **१९८६ (उपांत्यपूर्व फेरी)**
अर्जेंटिनाचा इंग्लंडवर २-१ विजय. विश्वचषक इतिहासातील सर्वांत गाजलेल्या लढतींपैकी एक. मॅराडोना यांचा 'हँड ऑफ गॉड' आणि वैयक्तिक कौशल्याच्या जोरावर केलेला 'गोल ऑफ द सेंच्युरी' याच सामन्यात.

■ **१९९८ (राउंड ऑफ १६)**
नियमित आणि अतिरिक्त वेळेतील २-२ अशा बरोबरीनंतर शूट-आऊटमध्ये अर्जेंटिना विजयी. १८ वर्षांच्या मायकेल ओवेनचा भन्नाट गोल आणि डिएगो सिमिओनीला लाथ मारल्यामुळे डेव्हिड बेकहॅमला मिळालेले रेड कार्ड हे या सामन्यातील लक्षवेधी क्षण.

■ **२००२ (साखळी फेरी)**
इंग्लंडची १-० बाजी. १९९८ मध्ये लाल कार्ड मिळवणाऱ्या बेकहॅमचा पेनल्टीवर गोल आणि इंग्लंडचा निसटता विजय.

'आयडीबीआय'साठी सुधारित बोली

दोन परदेशी बँका खरेदीस उत्सुक

वृत्तसंस्था, नवी दिल्ली



गेल्या अनेक वर्षांपासून खोळंबलेली आयडीबीआय बँकेच्या विक्रीची प्रक्रिया आता अंतिम टप्प्यात आली असून. कॅनडाच्या फेअरफॅक्स फायनान्शियल होल्डिंग्ज आणि दुबईच्या 'एमिरेट्स एनबीडी'कडून या हिस्सा खरेदीसाठी सुधारित आर्थिक बोली दाखल झाल्या आहेत, अशी माहिती सरकारी सूत्रांनी मंगळवारी दिली. ही प्रक्रिया एका महिन्याच्या आत पूर्णत्वाला जाण्याची अपेक्षा आहे.

दोन्ही अंतिम बोलीदारांना भारतीय बँकिंग क्षेत्राचा अनुभव आहे; दुबईस्थित 'एमिरेट्स एनबीडी'ने या वर्षाच्या सुरुवातीला भारतातील आरबीएल बँकेचे अधिग्रहण केले आहे, तर कॅनडाचे दिग्गज व्यावसायिक प्रेम वत्स यांच्या नेतृत्वाखाली 'फेअरफॅक्स फायनान्शियल'ची खासगी क्षेत्रातील सीएसबी बँकेमध्ये ४० टक्के भागीदारी आहे. दोन्ही बोलीदारांना गृह मंत्रालय आणि रिझर्व्ह बँकेकडून पात्रता मूल्यांकन आधीच प्राप्त झाले आहे. मार्चमध्ये खरेदीदारांकडून आलेल्या बोली सरकारच्या किमान अपेक्षित किंमतीपेक्षा कमी असल्याने सरकारने ही विक्री प्रक्रिया स्थगित केली होती. या महिन्यात विक्री प्रक्रिया पुन्हा सुरू करण्यात आली, असे माहिती सूत्रांनी दिली.

सरकार आणि एलआयसी मिळून आयडीबीआयमधील ६०.७२ टक्के हिस्सा विकण्याच्या तयारीत आहेत. दोहोंकडून ही विक्री प्रक्रिया सर्वप्रथम ऑक्टोबर २०२२ मध्ये २०२२ मध्ये सुरू केली गेली होती. मात्र बराच काळ ती मार्गी लागण्यात वेगवेगळ्या अडचणी आजवर आल्या आहेत. ही धोरणात्मक विक्री प्रक्रिया पुन्हा नव्याने सुरू झाल्यावर, सरकारने या महिन्याच्या सुरुवातीला या दोन इच्छुक कंपन्यांकडून सुधारित आर्थिक बोली मागवल्या. सोमवारी आर्थिक बोली सादर करण्यात आल्या आणि त्या अद्याप उघडल्या जायच्या आहेत, असे सूत्रांनी सांगितले. केंद्रीय अर्थमंत्रालय आणि 'दिपम' आता हा व्यवहार यशस्वी करण्यासाठी पूर्ण ताकदीने मैदानात उतरले आहेत. सध्या, सरकार आणि सरकारी मालकीची एलआयसी यांच्याकडे एकत्रितपणे आयडीबीआय बँकेत ९४.७१ टक्के हिस्सा आहे. यात सरकारची ४५.४८ टक्के आणि एलआयसीची ४९.२४ टक्के भागीदारी आहे.

सरकारची आक्रमक तयारी पाहता, आयडीबीआय बँकेच्या समभागांत पुन्हा एकदा तेजी येण्याची शक्यता वर्तवली जात आहे. जर हा व्यवहार पूर्ण झाला, तर भारतीय बँकिंग इतिहासातील हे सर्वात मोठे आणि यशस्वी खासगीकरण ठरेल. मंगळवारच्या सत्रात आयडीबीआयचा समभाग २.९४ टक्क्यांनी वधारून ८६.५४ रुपयांवर बंद झाला.

प्रत्यक्ष कर संकलन १६ टक्क्यांनी वाढून ६.५१ लाख कोटींवर

पीटीआय, नवी दिल्ली

विद्यमान आर्थिक वर्षात आतापर्यंत प्रत्यक्ष कर संकलन १६ टक्क्यांनी वाढून ६.५१ लाख कोटी रुपयांवर पोहोचले आहे. कंपनी कराच्या संकलनात झालेल्या वाढीमुळे या आर्थिक वर्षात १३ जुलैपर्यंत निव्वळ कर महसुलात १६.४० टक्क्यांची वाढ शक्य झाली आहे.

निव्वळ कंपनी कर संकलन २२ टक्क्यांनी वाढून २.४० लाख कोटी रुपये झाले आहे. तसेच, १३ जुलैपर्यंत वैयक्तिक प्राप्तिकर संकलन सुमारे १२ टक्क्यांनी वाढून ३.८४ लाख कोटी रुपयांवर गेले आहे. याच कालावधीत १.२२ लाख कोटी रुपयांचे कर परतावा (रिफंड) देण्यात आला आहे, जो मागील वर्षाच्या याच कालावधीच्या तुलनेत १४.५७ टक्क्यांनी अधिक आहेत. एकूण आधारावर विचार करता, प्रत्यक्ष कर संकलन १६.११ टक्क्यांनी वाढून ७.७३ लाख कोटी रुपयांवर गेले आहे. यामध्ये ३.३५ लाख कोटी रुपयांहून अधिक कंपनी कर आणि सुमारे ४.१२ लाख कोटी रुपयांच्या वैयक्तिक कराचा समावेश आहे.

सरकारने चालू आर्थिक वर्षात प्रत्यक्ष करांतून २६.९७ लाख कोटी रुपये जमा करण्याचे उद्दिष्ट राखले आहे; मागील आर्थिक वर्षात जमा झालेल्या २३.४० लाख कोटी रुपयांच्या तुलनेत त्यात १५ टक्क्यांची वाढ करण्यात आली. सध्याची आकडेवारी पाहता सरकार हे उद्दिष्ट सहज गाठेल अशी चिन्हे आहेत.

जीक्यूजीकडून अदानींच्या १२,००० कोटी मूल्याची समभाग विक्री

वृत्तसंस्था, मुंबई

अदानी समूहाचा संकटमोचक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या जीक्यूजी पार्टनर्स या जागतिक गुंतवणूकदार संस्थेने चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीत (एप्रिल-जून २०२६) समूहातील विविध कंपन्यांतील १२,०७७ कोटी रुपयांहून अधिक मूल्याच्या समभागांची बाजारात विक्री केल्याचे स्पष्ट होत आहे.

सार्वजनिक झालेल्या ताज्या आकडेवारीनुसार, जीक्यूजी पार्टनर्सने अदानी एंटरप्राइझेसमधील हिस्सेदारी मार्च तिमाहीअखेर ३.९ टक्क्यांवरून कमी करून जून तिमाहीत थेट २.१ टक्क्यांवर आणली आहे. या माध्यमातून जीक्यूजीने तब्बल १.८ टक्के हिस्सा विकला आहे.

फुटबॉलच्या 'युद्धभूमी'वर अर्जेंटिना वि. इंग्लंड



(पान १ वरून)

कार्ड मिळाले नि तो सामना इंग्लंडने गमावला. तर २००२मध्ये बेकहॅमच्याच पेनल्टीच्या जोरावर इंग्लंडने बाजी मारली. अशा प्रकारे दोन्ही संघांतील आजवरचे सर्व सामने चुरशीचे झाले आहेत.

शैली आणि विचारसरणी

दोन्ही संघांना स्वतःच्या फुटबॉल संस्कृतीविषयी अभिमान आहे, तितकाच प्रतिस्पर्धी संस्कृतीविषयी तिटकारा आहे. अर्जेंटिनाचा खेळ रडीचा आणि धसमुसळा असतो ही इंग्लंडची तक्रार, तर पराभवासाठी सबबी मांडण्याची इंग्लंडची जुनी खोड, हा अर्जेंटिनाचा आक्षेप. दोन शैली आणि विचारसरणीतील हे द्वंद्व उपांत्य सामन्यातही प्रतिबिंबित होईल.

दुफळी निर्माण करणे सोपे, पण आमची एकजूट कायम!

इंग्लंडच्या केनकडून प्रसारमाध्यमांतील चर्चांना पूर्णविराम

अटलांटा : विश्वचषक फुटबॉल स्पर्धेच्या उपांत्य फेरीत गतविजेत्या अर्जेंटिनाशी होणाऱ्या सामन्यापूर्वी इंग्लंड संघात मतभेद असल्याची चर्चा रंगली होती. गेल्या सामन्यानंतर प्रशिक्षक थॉमस टुकेल यांनी संघाच्या एकंदर कामगिरीवर केलेल्या जाहीर टीकेनंतर ज्युड बेलिंगहॅमच्या प्रतिक्रियेमुळे संघात फूट पडल्याचे ब्रिटिश प्रसारमाध्यमांत म्हटले जात होते. मात्र, सामन्याच्या पूर्वसंध्येला कर्णधार हॅरी केनने या सर्व चर्चांना पूर्णविराम देत आमची एकजूट कायम असल्याचे स्पष्ट केले.



उपांत्यपूर्व फेरीतील नॉर्वेविरुद्धच्या सामन्यानंतर टुकेल यांनी विजय मिळवूनही संघाच्या कामगिरीबद्दल नाराजी व्यक्त करत इंग्लंड नशिबवान ठरल्याचे म्हटले होते. त्यानंतर त्या सामन्यात निर्णायक भूमिका बजावलेल्या बेलिंगहॅमने, 'त्यांना (प्रशिक्षक) अशा परिस्थितीत (उष्ण आणि दमट) खेळणे किती कठीण असते हे बहुधा माहित नसावे. कोणी काय बोलले, हा त्यांचा दृष्टिकोन आहे,' अशी प्रतिक्रिया दिली. त्यामुळे प्रशिक्षक आणि खेळाडूंमध्ये मतभेद असल्याच्या बातम्या ब्रिटिश प्रसारमाध्यमांत झळकल्या होत्या. मात्र, या चर्चेकडे दुर्लक्ष करत केनने मैदानाबाहेरही आपल्या नेतृत्वाची छाप पाडली.

''इंग्लंडच्या संघात फूट पाडण्याचा बरेचदा प्रयत्न केला जातो, पण आमची खरी ताकद आमच्या एकजुटीत आहे,'' अशा ठाम शब्दांत केनने प्रत्युत्तर दिले. ''अखेरच्या क्षणापर्यंत रंगलेल्या सामन्यानंतर अवघ्या पाच मिनिटांत खेळाडूकडून परिपूर्ण प्रतिक्रियेची अपेक्षा ठेवणे योग्य नाही,'' असे केन म्हणाला.

अक्षरचे अष्टपैलू योगदान

वृत्तसंस्था, बर्मिंगहॅम

अक्षर पटेल (४/६२ आणि नाबाद ५७) याची अष्टपैलू कामगिरी, त्याला कर्णधार शुभमन गिल (८०) आणि वॉशिंग्टन सुंदर (नाबाद ५२) यांची मिळालेली साथ यामुळे भारताने पहिल्या एकदिवसीय क्रिकेट सामन्यात मंगळवारी इंग्लंडवर सहा गडी आणि २८ चेंडू राखून विजय मिळवला. यामुळे भारताने तीन सामन्यांच्या मालिकेत १-० अशी आघाडी घेतली.

इंग्लंडने दिलेल्या २५९ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना रोहित शर्मा (११) व विराट कोहली (५) हे भारताचे अनुभवी फलंदाज लवकर बाद झाले. यानंतर गिल आणि श्रेयस अय्यर (३५) यांनी संघाचा डाव सावरला. दोघांनी तिसऱ्या गड्यासाठी १०१ धावा जोडल्या. पायाच्या दुखापतीमुळे गिलने मैदान सोडले. मग अय्यर धावचीत झाला, तर केएल राहुल (१) अपयशी ठरला. यानंतर सुंदर आणि अक्षर यांनी पाचव्या गड्यासाठी १०२ धावांची अभेद्य भागीदारी रचली. त्यामुळे भारताने ४५.२ षटकांत ४ बाद २६२ धावा करत विजय साकारला. त्यापूर्वी, जो रूट (नाबाद ७६) आणि लिआम डॉसन (६८) यांच्या अर्धशतकी खेळीमुळे इंग्लंडने ४७.५ षटकांत २५८ धावसंख्येपर्यंत मजल मारली.

pnb Housing Finance Limited Ghar Ki Baat

परिशिष्ट – IV-A स्थावर मालमत्तेची ई-लिलाव-जाहीर विक्री सूचना

सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, 2002 मधील नियम 8(6) च्या तरतुदींसह वाचण्यात येणाऱ्या सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शीअल ॲसेट्स अँड एनफोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 अंतर्गत स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना

नोंदणीकृत कार्यालयः- 9 वा मजला, अंतरीक्ष भवन, 22 कस्तुरबा गांधी मार्ग, नवी दिल्ली -110001, फोनः-011-23357171, 23357172, 23705414, वेबः- www.pnbhousing.com
बी.ओ.नागपूरः अचराज टॉवर, पहिला मजला, काटोल रोड, राजनगर, सदर, नागपूर, महाराष्ट्र – 440013.

याद्वारे सर्वसाधारणपणे जनतेला आणि विशेषतः कर्जदार आणि जामीनदार यांना रकाना क्र. - ए मध्ये सूचित केलेली नोटीस देण्यात आली आहे की, खाली वर्णन केलेल्या स्थावर मालमत्तेचे वर्णन कॉलम क्र -डी मध्ये गहाण/सुरक्षित धनको/ **मेसर्स पीएनबी हाउसिंग फायनान्स लिमिटेड** यांच्या प्राधिकृत अधिकाऱ्याने (रकाना क्र. - सी यामध्ये वर्णन केल्याप्रमाणे) ज्याचा रचनात्मक/भौतिकदृष्ट्या ताबा सुरक्षित धनको यांनी घेतला आहे, त्याची खाली नमूद केलेल्या तपशिलांनुसार **"जसे आहे, तिथे आहे, जे आहे, तसे आहे" आणि "तेथे जे काही आहे या तत्त्वावर"** विक्री केली जाईल. तारखेनुसार सुधारित असलेल्या सिक्युरिटी इंटरेस्ट इन्फोर्समेंट नियम, 2002 च्या नियम - 8 (6) आणि 9 अंतर्गत रकाना क्र. ए यात दर्शवलेल्या प्रकरणाप्रमाणे याद्वारे कर्जदार/गहाण ठेवणारे/कायदेशीर वारस, कायदेशीर प्रतिनिधी, (ज्ञात किंवा अनोळखी), निष्पादक, प्रशासक, उत्तराधिकारी, संबंधित कर्जदार/गहाण ठेवणारे (मृत झाल्यापासून) यांना नोटीस देण्यात आली आहे. विक्रीच्या तपशीलवार अटी व शर्तींसाठी, कृपया **मे. पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड**/सुरक्षित धनकोच्या वेबसाइटवर प्रदान केलेल्या दुव्याचा संदर्भ घ्या म्हणजे **www.pnbhousing.com.**

कर्ज क्र., कर्जदार/सह-कर्जदार/ जामीनदार/कायदेशीर वारस यांचे नाव (ए)	मागणी केलेली रक्कम आणि तारीख (बी)	ताब्याचे स्वरूप (सी)	गहाण ठेवलेल्या मालमत्तेचे वर्णन (डी)	आरक्षित किंमत (आरपी)(ई)	ईएमडी (आरपीच्या 10%) (एफ)	बोली सादर करण्याची अंतिम तारीख (जी)	बोली वृद्धी दर (एच)	तपासणीची तारीख आणि वेळ (आय)	लिलावाची तारीख आणि वेळ (जे)	ज्ञात भार न्यायालयीन प्रकरणे, जर असतील तर (के)
एचओयू/एनएजी/1217/463057, रवी माधोराव रंभाड / त्रिवेणी रवी रंभाड, बी.ओ.: नागपूर	रु. 37,88,434.43 आणि दि. 26.10.2021	भौतिक दृष्ट्या ताबा	रुक्मिणी ब्लॉक 14 इमारत डी 1ला मजला 101, वृंदावन, क्र. 248 (भाग), 257 (भाग), 258 (भाग), प्लॉट नं 1, 2, 4, 6, 7 पीएच नं 42, जामठा, नागपूर, महाराष्ट्र- 440012, भारत.	रु. 37,75,000	रु. 3,77,500	29/07/2026	रु. 10,000	दि. 22.07.2026 दुपारी 12.00 वा. ते सायं. 04.00 वा.	दि. 30.07.2026 दुपारी 2.00 वा. ते दुपारी 3.00 वा.	माहीत नाही
एचओयू/एनएजी/0119/641378, रवींद्र गजानन डेकाटे / देवकी गजाननराव डेकाटे/ देवकी हार्डवेअर ॲण्ड प्लास्टिक, बी.ओ.: नागपूर	रु. 23,92,763.07 आणि दि. 20.09.2025	भौतिक दृष्ट्या ताबा	फ्लॅट क्र. 201, दुसरा मजला, शिवनेरी अपार्टमेंट, शीट क्र. 103, मेहंदीबाग रोड, नागपूर, महाराष्ट्र - 440017, भारत.	रु. 20,09,000	रु. 2,00,900	29/07/2026	रु. 10,000	दि. 23.07.2026 दुपारी 12.00 वा. ते दुपारी 04.00 वा.	दि. 30.07.2026 दुपारी 2.00 वा. ते दुपारी 3.00 वा.	माहीत नाही

*आनुषंगिक खर्च, खर्च, शुल्क इ. देय झाल्याच्या तारखेपर्यंत आणि/किंवा त्याची प्राप्ती होईपर्यंत संबंधित पुढील व्याज @18% दरसाल लागू आहे. ** पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेडच्या अधिकृत अधिकाऱ्याच्या सर्वोत्तम माहिती आणि ज्ञानानुसार, यावर नमूद केलेल्या स्थावर/सुरक्षित मालमत्तेच्या संदर्भात इतर कोणतेही दायित्व/दावे नाहीत, जे कॉलम क्र.- के यामध्ये उघड केले आहे. यशस्वी खरेदीदार/बोलीदाराकडून त्याच्या/तिच्या शेवटी पूर्ण केले जातील/अदा केले जातील. संभाव्य खरेदीदार/बोलीदारांना विनंती करण्यात आली आहे की, त्यांनी नमूद केलेल्या भारांची सत्यता स्वतंत्रपणे पडताळून पाहावी. (1.) आजपर्यंत, पीएनबीएचएफएल/पीएनबीएचएफएलच्या अधिकृत अधिकाऱ्याला वरील स्थावर मालमत्ता/सुरक्षित मालमत्तेची विक्री, विल्हेवाट आणि/किंवा विल्हेवाट लावण्यापासून प्रतिबंधित करणारा आणि/किंवा न्यायालयाचा आदेश नाही. (2.) संभाव्य खरेदीदार/बोलीवर आणि इच्छुक पक्ष स्वतंत्रपणे कार्यवाही/ऑर्डर इ. जर असेल तर, कॉलम क्र.- के यामध्ये नमूद केलेल्या बाजूची तपासणी करू शकतात, पीएनबीएचएफएल यांच्याकडे उपलब्ध असलेल्या शीर्षकाच्या दस्तऐवजांच्या शीर्षकासह परंतु त्यापुरते मर्यादित नाही आणि निविदा/बोली अर्ज सादर करण्यापूर्वी किंवा प्रस्ताव देण्याआधी सर्व बाबतीत स्वतःचे समाधान करून घ्या. बोलीदाराने या लिलावाच्या अटी व शर्तींवर बोली फॉर्मसह स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. (3.) कृपया लक्षात घ्या की, सिक्युरिटी इंटरेस्ट (इन्फोर्समेंट) नियम, 2002 च्या नियम 9(3) नुसार, बोली लावणारा/खरेदीदार कायदेशीररीत्या विक्री किमतीच्या 25% रक्कम जमा करण्यास बांधील आहे, (इसारा ठेव अनामतसह, जर असेल तर, जमा) त्याच दिवशी किंवा पुढील कामकाजाच्या दिवसाच्या नंतर नाही. सिक्युरिटी इंटरेस्ट (इन्फोर्समेंट) नियम, 2002 च्या नियम 9(2) नुसार सुरक्षित धनकोकडून विक्री किमतीच्या 25% रक्कम मिळाल्यानंतरच विक्रीची पुष्टी बोलीदाराच्या नावे केली जाऊ शकते. विक्रीच्या मोबदल्याच्या उर्वरित 75% रक्कम खरेदीदाराने विक्री पुष्टीकरण पत्राच्या पोचपावती तारखेपासून 15 दिवसांच्या आत जमा करणे आवश्यक आहे आणि अशा ठेवी न दिल्यास, मालमत्ता/सुरक्षित मालमत्ता पुन्हा विकली जाईल. (4.) मेसर्स सी1 इंडिया प्रायव्हेट लिमिटेड अधिकृत अधिकाऱ्याला ई-लिलावाद्वारे विक्री करण्यास मदत करेल, ज्याचे कॉर्पोरेट कार्यालय प्लॉट क्र. 68, 3 मजला, सेक्टर 44, गुडगाव, हरियाणा 122003 वेबसाइट www.bankeauctions.com येथे आहे, मालमत्तेची पाहणी किंवा बोली कागदपत्र मिळवण्यासंबंधी कोणत्याही मदतीसाठी, तसेच इतर कोणत्याही प्रश्नासाठी किंवा नोंदणीसाठी, तुम्हाला विवेक लोढा यांच्याशी संपर्क साधावा लागेल, टोल फ्री क्रमांक-1800 120 8800, ई-मेल: auction@pnbhousing.com, ते पीएनबीएचएफएल यांचे अधिकृत व्यक्ती आहेत किंवा वेबसाईट www.pnbhousing.com याला भेट द्या.

ठिकाणः नागपूर दिनांकः 15.07.2026 सही/- अधिकृत अधिकारी, पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड

SBI स्टेट बँक ऑफ इंडिया State Bank of India

शाखा - वणी मुख्य
टेगौर चौक, वणी, जिल्हा यवतमाळ- 445304

(नियम - 8(1)) **प्रत्यक्ष ताबा सुचना** (अचल संपत्ती करीता फक्त)

ज्याअर्थी, सेक्युटरायझेशन आणि रीकन्स्ट्रक्शन ऑफ फाइनैंशियल असेटस एंड एनफोर्समेंट ऑफ सिक्यूरिटी इंटरेस्ट ॲक्ट 2002 च्या अंतर्गत खालील हस्ताक्षरकर्ता हे **स्टेट बँक ऑफ इंडिया** शाखेच्या अधिकृत अधिकारी आहे. तसेच सिक्यूरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स सरफेसी ॲक्ट 2002 चे सेक्शन 13 (2) च्या सोबतच वाचला जाणारे रूल 3 च्या अंतर्गत कर्जदार/ जमानतदार यांना डिमांड नोटिस दिनांक खालिल नमुद आहे देऊन सुचनेत दर्शविलेली रक्कम ही सुचना प्राप्तीनंतर 60 दिवसांचा आत भरपाई करण्याच्या उद्देश्याने सुचना मध्ये दर्शविलेल्या तारखेला दिली होती.
कर्जदार / जमानतदार उक्त रक्कमेची भरपाई करण्याकरीता असमर्थ सिद्ध ठरल्यामुळे कर्जदार/ जमानतदार तसेच आम जनतेला याद्वारे सुचना देण्यात येते की, खालील दिलेल्या 13(4) सह वाचला जाणाऱ्या ॲक्ट कार्य क्र 8 सिक्यूरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स च्या अंतर्गत खालील हस्ताक्षरकर्त्याने खाली दिलेल्या संपत्तीचा **प्रत्यक्ष ताबा** घेतला आहे. विशेष करून कर्जदार/ जमानतदार आणि गहाणदार तसेच आम जनतेला याद्वारा वरील संपत्तीच्या विषयी काहीही घेणे देणे न करण्याकरीता जागृत केले जात आहे. तसेच पुढील संपत्तीचे व रक्कमेवरील व्याजाचे आणि अन्य खर्चाचे देणेघेण **स्टेट बँक ऑफ इंडिया** शाखेचे त्यावरील व्याजासह प्रभाराधिन राहिल.
सुरक्षित मालमत्तेची पुर्तता करण्यासाठी उपलब्ध वेळेच्या बाबतीत सरफेसी अधिनियमाच्या कलम 13 मधील उप-कलम (8) मधील तरतुदीसाठी कर्जदाराचे लक्ष निमंत्रित केले जात आहे.

अ. क्र.	कर्जदार / जमानतदार आणि गहाणदाराचे नाव	मांग सुचनेची थकबाकी रक्कम (रुपये)	अचल संपत्तीचे विवरण	मांग सुचनेची तारीख	ताब्याची तारीख
1.	श्री नितीन राजकुमार नक्षणे (कर्जदार), पत्ता : वार्ड नं. 03, नवरगाव, ता. वणी, जि. यवतमाळ-445304. पत्ता : साई लिला, मुकूटबन रोड, वणी, ता. वणी. जि. यवतमाळ.	रु. 22,72,568.63 + व्याज + शुल्क 03/10/2025 रोजी आणि खर्च, इत्यादि, त्यावरील	सर्व भाग आणि तुकडा असलेले संपत्ती स्थित **रो हाऊस नं. 06**, सर्व्हे नं. 113/01अ, "रुख्मिणी विल्ला", "साई लीला" टाउनशिप, मुकूटबन रोड, वणी, तह. वणी. जिल्हा यवतमाळ. **चतुर्सिमा खालीलप्रमाणे** : **पुर्व** - प्लॉट नं. 15, **पश्चिम** - 9 मी. लेआऊट रोड, **उत्तर** - रो हाऊस नं. 05, **दक्षिण** - रो हाऊस नं. 07.	03/10/2025	10/07/2026 (प्रत्यक्ष)

दिनांक : 10/07/2026
स्थळ : यवतमाळ
(इंग्रजीतील मूळ मजकूर ग्राह्य धरण्यात येईल)
अधिकृत अधिकारी स्टेट बँक ऑफ इंडिया

SHRIRAM Asset Reconstruction

श्रीराम ॲसेट रिकन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड (एसएआरपीएल)
(विविध एसएआरसी ट्रस्टचे विश्वस्त म्हणून काम करत आहे)
नोंदणीकृत कार्यालयः श्रीराम हाऊस, क्र. 4, बुर्किट रोड, टी. नगर, चेन्नई – 600017।
कॉर्पोरेट कार्यालयः युनिट क्र. एफएफ-ए-05, ए विंग, 1ला मजला, आर्ट गिल्ड हाऊस, फिनिक्स मार्केट सिटी, एलबीएस मार्ग, कुर्ला (पश्चिम), मुंबई-400070, वेबसाइटः www.shriramarc.com; फोन क्र.: 1800 120 2389; customercare@shriramarc.com.

जाहीर सूचनाः स्थावर मालमत्तेच्या ई-लिलाव-सह-विक्रीची सूचना
परिशिष्ट-4-ए यानुसार सिक्युरिटी इंटरेस्ट (इन्फोर्समेंट) रूल्स, 2002 च्या नियम 6,8 (6) आणि 9 ची तरतुद सहवाचता सिक्युरिटायजेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स ॲण्ड इन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 अंतर्गत स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी लिलाव.

याद्वारे सर्वसामान्य जनतेला आणि विशेषतः कर्जदार, जामीनदार आणि गहाणदार यांना सूचना देण्यात येत आहे की खाली वर्णन केलेली स्थावर मालमत्ता, जी सुरक्षित धनको, आता **श्रीराम ॲसेट रिकन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड,** विविध एसएआरपीएल ट्रस्टचे विश्वस्त म्हणून कार्यरत, यांच्याकडे गहाण/शुल्क प्रभारित आहे [नोंदणीकृत हस्तांतरण कराराद्वारे वित्तीय मालमत्तेच्या हस्तांतरणानुसार] (यापुढे "एसएआरपीएल" म्हणून संबोधले जाईल) सरफेसी कायद्याच्या कलम (5) अन्वये, खाली नमूद केलेले कर्जदार, सह-कर्जदार आणि गहाण ठेवणारे यांच्यासह विविध कर्जदारांशी संबंधित वित्तीय मालमत्ता, त्यावरील निर्माण केलेल्या मूळ सुरक्षा हितसंबंधांसह, तसेच त्यावरील सर्व हक्क, मालकी आणि हितसंबंध मूळ कर्जदाता/हस्तांतरणकर्ता **मे. जना स्मॉल फायनान्स बँक लिमिटेड (जेएसएफबीएल),** यांच्याकडून संपादन करून, मूळ कर्जदाता/हस्तांतरणकर्ता आणि/ किंवा **श्रीराम ॲसेट रिकन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड,** म्हणजेच हस्तांतरणकर्ता **मे. जना स्मॉल फायनान्स बँक लिमिटेड** यांनी मंजूर केलेल्या आणि वितरित केलेल्या कर्जाचे हस्तांतरणकर्ता, यांच्या अधिकृत अधिकाऱ्याने ज्या मालमत्तेचा **भौतिक ताबा** घेतला आहे, ती मालमत्ता, सिक्युरिटी इंटरेस्ट (इन्फोर्समेंट) रूल्स, 2002 च्या नियम 8(6) ची तरतूद आणि निर्देशित नियम 9(1) यानुसार तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे, कर्जदार, सह-कर्जदार आणि गहाण ठेवणारे यांच्याकडून सुरक्षित धनको यांना देय असलेली थकबाकीची रक्कम तसेच त्यावरील पुढील व्याज, शुल्क, खर्च, इत्यादी वसूल करण्यासाठी, खाली नमूद केलेल्या लिलाव वेळापत्रकानुसार **"जशी आहे तशी आहे", "जे आहे ते आहे", आणि "तिथे जे काही असेल ते"** या तत्त्वावर विकली जाईल. कर्जदार आणि जामीनदारांचे तपशील, देय थकबाकी रक्कम, स्थावर मालमत्तेचे संक्षिप्त वर्णन आणि त्यावर ज्ञात असलेले बोजा, जर असतील तर, आरक्षित किंमत, इसारा ठेव अनामत रक्कम ठेव, वाढीव बोली, लिलावाची तारीख आणि तपासणीची तारीख देखील खालीलप्रमाणे दिली आहेः

कर्ज खाते क्र. ट्रस्टचे नाव आणि असाइनर/ मूळ कर्जदात्याचे नाव	कर्जदार/सह-कर्जदार/ जामीनदार/गहाण ठेवणारे यांचे नाव	कलम 13(2) मागणी सूचनेची तारीख आणि रक्कम तसेच ताब्याशी संबंधित तपशील	आरक्षित किंमत, ईएमडी, बोली वाढ, बोली अर्ज सादर करण्याची शेवटची तारीख	लिलाव आणि तपासणी तारीख आणि वेळ	संपर्क व्यक्तीची माहिती – एओ आणि सेवा प्रदाता
331559420001475 आणि 31559410000841 मेसर्स जना स्मॉल फायनान्स बँक लिमिटेड यांच्याकडील ट्रस्ट खाते क्रमांक सार्क ट्रस्ट-11 अंतर्गत	1) श्री.प्रशांत बबनराव विधळे, 2) श्रीमती वैशाली प्रशांतराव विधळे	सूचना दिनांकः 25-09-2025 रक्कम रु. 11,67,401.69 रुपये अकरा लाख सदुसष्ट हजार चारशे एक आणि एकोणसत्तर पैसे फक्त यासाठी दि. 21.09.2025 रोजीनुसार थकित देय ताब्याचा प्रकारः भौतिक आणि दिनांकः 12.06.2026	आरक्षित किंमतः रु. 10,01,669.40 बोली वाढः रु. 30,000.00 ईएमडी रक्कमः रु. 1,00,166.94 (आर.पी. च्या 10%) ईएमडी सादर करण्याची अंतिम तारीख आणि वेळः दि. 03.08.2026 सकाळी 10.00 वा. ते दुपारी 02.00 वा. पर्यंत	लिलावाची तारीख व वेळः दि. 04.08.2026 आणि सकाळी 11.00 वा. ते दुपारी 02.00 वा. पर्यंत तपासणीची तारीख व वेळः दि. 25.07.2026 आणि सकाळी 11.00 वा. ते दुपारी 02.00 वा. पर्यंत जेएसएफबीएल/एसएआरपीएलला ज्ञात असलेले बोजे- माहित नाही	ऑलविन नरेश 7709564284 सुमेश मित्तल 9993587797 रामपाल गौतम 9625977792

गहाण ठेवलेल्या मालमत्तेचे वर्णन
ग्रामपंचायत मालमत्ता क्र. 88, अ.क्र. 91, एकूण मोजमापे क्षेत्रफळ 560 चौ.फूट (52.04 चौ.मीटर.), येथे स्थित मौजे जावळा, ग्रामपंचायत जावळा शहापूर, तालुका चांदूर बाजार व जिल्हा अमरावती यांचे ते सर्व तुकडे आणि पार्सल, **सीमाः पूर्वेलाः रस्ता, पश्चिमेलाः निलेश विधळे यांचे घर, उत्तरेलाः प्रभाकरराव विधळे यांचे घर आणि दक्षिणेलाः अरविंद ठाकरे यांचे घर.**

1. विक्रीच्या सविस्तर अटी व शर्ती, बोली अर्ज आणि इतर माहितीसाठी, तुम्ही सुरक्षित कर्जदार/असाइनी/श्रीराम ॲसेट रिकन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड यांच्या https://www.shriramarc.com या वेबसाइटवर [illegible] https://bankauctions.in [illegible] www.foreclosureindia.com [illegible] info@bankauctions.in / vikas@bankauctions.in [illegible]
2. [illegible]

[नियम 9(1) सिक्युरिटी इंटरेस्ट (इन्फोर्समेंट) नियम 2002] अंतर्गत वैधानिक 15 दिवसांची विक्री सूचना
[illegible]

ठिकाणः अमरावती
दिनांकः 14.07.2026
सही/- अधिकृत अधिकारी श्रीराम ॲसेट रिकन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड (एसएआरपीएल ट्रस्ट-11 चे विश्वस्त म्हणून क्षमतेत कार्य करत आहे)

homefirst Home First Finance Company India Limited — **ताबा सूचना**
CIN: L65990MH2010PLC240703 Website: homefirstindia.com
Phone No.: 180030008425 Email ID: loanfirst@homefirstindia.com

संदर्भः सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेन्ट) रुल्स, 2002 च्या नियम 8 उप-नियम (1) अंतर्गत ताबा सूचना

ज्याअर्थी, निम्नस्वाक्षरीकार हे **होम फर्स्ट फायनान्स कंपनी इंडिया लिमिटेड** चे प्राधिकृत अधिकारी असून त्यांनी आपणांस, म्हणजे खाली नमूद कर्जदारांना सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शिअल ॲसेट्स अँड एनफोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 (2002 चा नियम क्र. 54) अंतर्गत आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेन्ट) रुल्स, 2002 मधील नियम 3 सह वाचण्यात येणाऱ्या अनुच्छेद 13(2) अंतर्गत प्राप्त झालेल्या अधिकारांचा वापर करीत खाली नमूद संबंधित तारखांना मागणी सूचना पाठविल्या ज्यांत त्यांना सदर सूचना प्राप्त होण्याच्या दिनांकापासून 60 दिवसांचे आत थकबाकी रकमांचा भरणा करण्याचे आवाहन करण्यात आले होते. परंतु, आपण सर्व कर्जदारांनी विहित कालावधीत थकबाकी रकमांचा भरणा केलेला नाही, त्यामुळे **होम फर्स्ट फायनान्स कंपनी इंडिया लिमिटेड** यांनी सर्फेसी अधिनियम,2002 मधील अनुच्छेद 13 मधील उप-विभाग (4) मधील तरतुदी आणि त्याअंतर्गत तयार करण्यात आलेल्या नियमांतर्गत बहाल करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करीत खाली नमूद केल्यानुसार अनामत मत्तांचा ताबा घेतलेला आहेः

अ. क्र.	कर्जदार / सह-कर्जदार / जामीनदाराचे नाव	तारण मालमत्तेचे वर्णन	मागणी सूचना दिनांक	मागणी सूचना दिनांक रोजी एकूण थकबाकी (रु.)	ताबा दिनांक
1.	अश्फाक अली शब्बीर अली, आसिया परवीन अश्फाक अली	प्लॉट क्र. 15, शिव नगर, सर्वे क्र. 126/4 आणि 126/5, गट क्र. 854 आणि 855, मौजे-वालगाव भाग-01, प्रगने-नांदगाव पेठ, ता. जि. अमरावती, एनएपी 34, अमरावती, महाराष्ट्र, 444701, चतुःसीमाः पूर्वेस- प्लॉट क्र. 20, पश्चिमेस- लेआऊट रस्ता, उत्तरेस- प्लॉट क्र. 14, दक्षिणेस- प्लॉट क्र. 16.	03-06-2025	10,93,388	09-07-2026

कर्जदार सदर रकमेची परतफेड न करू शकल्याने याद्वारे कर्जदार / जामीनदार आणि सर्व लोकांना सूचित करण्यात येते की निम्नस्वाक्षरीकरांनी सदर नियमांमधील नियम 8 सह वाचण्यात येणाऱ्या सदर अधिनियमातील अनुच्छेद 13(4) अंतर्गत बहाल करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करीत खाली वर्णन केलेल्या मालमत्तेचा ताबा घेतलेला आहे.
कर्जदार / जामीनदार आणि सर्व लोकांना याद्वारे सावधगिरीची सूचना देण्यात येते की त्यांनी वर नमूद मालमत्ता / अनामत मत्तांच्या संदर्भात किंवा तीमधील कोणत्याही भागाच्या संदर्भात कोणताही व्यवहार करू नये आणि असा कोणताही व्यवहार केल्यास तो **होम फर्स्ट फायनान्स कंपनी इंडिया लिमिटेड** च्या वर मालमत्ता / अनामत मत्तेसमोर नमूद केलेली रक्कम आणि संपूर्ण भरण्याच्या दिनांकापर्यंतचे व्याज एवढ्या रकमेच्या भाराधीन असेल.
सदर अनामत मत्ता सोडवून घेण्यासाठी उपलब्ध असलेल्या वेळेच्या संदर्भात कर्जदारांचे लक्ष सदर अधिनियमातील अनुच्छेद 13 मधील उप-विभाग (8) कडे वेधण्यात येते.

स्थानःअमरावती, दिनांकः 15-07-2026 प्राधिकृत अधिकारी, होम फर्स्ट फायनान्स कंपनी इंडिया लिमिटेड

हे पत्र मुद्रक आणि प्रकाशक विवेक विद्याधर रानडे यांनी मालक, दि इंडियन एक्स्प्रेस (पी) लिमिटेड (आधीचे नाव - दि इंडियन एक्स्प्रेस लिमिटेड), यांच्यासाठी लोकसत्ता, प्लॉट नं. ११२, २०७ आणि २०८, एमआयडीसी इंडस्ट्रियल एरिया, बुटीबोरी, नागपूर-४४११०८ येथे छापून प्लॉट. नं. ३८, ॲडिसन ट्रेड सेंटर, पहिला मजला, अंबाझरी ले-आऊट, अंबाझरी, नागपूर-४४००१० येथे प्रसिद्ध केले. दूरध्वनी क्रमांक : २२३०४२१, २२३६८९७, फॅक्स क्रमांक : २२३६९८६.
लोकसत्ता मुंबई कार्यालय : मफतलाल सेंटर, सातवा मजला, रामनाथ गोएंका मार्ग, नरिमन पॉइंट, मुंबई - ४०० ०२१. दूरध्वनी क्रमांक : [illegible] महापे कार्यालय : प्लॉट नं. ईएल १३८, टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, महापे, नवी मुंबई-४०० ७१०. दूरध्वनी : ०२२-२७६३९९००; फॅक्स : ०२२-२७६३३००८. पुणे कार्यालय : एक्स्प्रेस हाउस, प्लॉट नं. १२०५/२/६, शिरोळे रस्ता, शिवाजीनगर, पुणे ४११ ००४. दूरध्वनी : ०२०-६७२४१०००,
फॅक्स : ०२०-६७२४१४४०. ■ अध्यक्ष, संचालक मंडळ : विवेक गोएंका ■ कार्यकारी संपादक : वैदेही ठकार ■ संपादक : गिरीश कुबेर ■ निवासी संपादक : देवेंद्र गावंडे* (*पी.आर.बी. कायद्यानुसार बातम्यांच्या निवडीची जबाबदारी यांच्यावर आहे.) Loksatta, RNI. No. 54743/92, Dated 30-4-92.© दि. इंडियन एक्स्प्रेस (पी) लिमिटेड. सर्व हक्क सुरक्षित. लेखी अनुमतीशिवाय संपूर्ण अथवा अंशतः पुनःप्रकाशनास वा पुनःप्रसारणास मनाई.